# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड डि.सी.आर. दिनांक २५/०७/२०१८**

**गुन्हेगारीच्या गटबाजीतुन- पुर्वदुश्मनीतुन कृष्णा खाटीक याचे अपहरण करुन खुन, प्रेत जाळुन नष्ट केले, एल.सी. बी. ची कामगीरी, 07 आरोपी केले अटक**

नांदेड शहरातील काही कुख्यात गुन्हेगार पुर्व दुश्मनीवरुन, गटबाजीवरुन व वर्चस्वाचे भांडणावरुन, दिनांक 30 मार्च 2018 रोजी मालेगांव हाद्दीतील स्वराज्य ढाबा येथुन कृष्णा खाटीक पिता पंजाबराव ढोणे रा. शहीदपुरा, नांदेड यांचे अपहरण करुन, त्याचा खुन करुन त्यास जाळुन टाकुन पुरावा नष्ट केल्याची माहीती स्थानिक गुन्हे शाखा नांदेड येथील सहा. पोलीस निरीक्षक श्री विनोद दिघोरे यांना मिळाली.

त्यावरुन सदरची माहीती त्यांनी मा. पोलीस अधीक्षक श्री चंद्रकिशोर मीणा यांना व पोलीस निरीक्षक श्री सहाने साहेब यांना सांगुन, त्यांचे मार्गदर्शन व सुचना नुसार त्यांनी व त्यांचे सोबतचे पोलीस अधीकारी व कर्मचारी यांनी मीळुन त्यांचे नांदेड शहरातील गोपनिय नेटवर्कद्वारे माहीती काढुन परिश्रम घेऊन कुख्यात गुन्हेगारांचा शोध घेतले, त्यांना ताब्यात घेवुन गुन्हयाबाबत विचारपुस करुन पोलीसी खाक्या दाखवताच, खरी हाकीकत समोर आली की, कुख्यात गुन्हेगार 01) लखन दशरथसिंह ठाकुर रा. चिखलवाडी, नांदेड, 02) विक्की राम चव्हाण रा. कुंभारगल्ली नांदेड, 03) विकी दशरथसिंह ठाकुर रा. चिखलवाडी नांदेड, 04) ईश्वरसिंग जशवंतसिंग गिरणीवाले, रा. चिखलवाडी, 05) विशाल ऊर्फ ए.व्ही. पिता गंगाधर आंबे रा. शिवशक्तीनगर, नांदेड, 06) सौरभ ऊर्फ दिपक संजय टाकळीकर रा. शिवशक्तीनगर, मीलगेट रोड, नांदेड, 07) रवि नारायणसिंह ठाकुर रा. रविनगर, जुना कौठा, नांदेड व ईतर तीन बाल गुन्हेगारांनी मीळुन एकुन चार मोटार सायकलवर कृष्णा खाटीक यांचा नांदेड येथुन शोध घेत जाऊन, दिनांक 30 मार्च 2018 रोजी मालेगांव ता. अर्धापुर हाद्दीतील स्वराज्य ढाबा येथे कृष्णा खाटीक पिता पंजाबराव ढोणे रा. शहीदपुरा, नांदेड यास दोन गुन्हेगारी गटातील पुर्व दुश्मनीवरुन त्यास जबरीने पकडुन खंजरने मारहाण करुन, जागीच गंभीर जखमी करुन, जबरीने 220 पलसर मोटार सायकलवर बसवुन अपहरण करुन, त्यास पोलीस ठाणे नांदेड ग्रामीण हाद्दीतील कौठा नांदेड शिवारातील कौठा-असर्जन बायपास चे नवीन पुलाचे पश्चिम बाजुस गोदावरी नदीच्या पात्राचे तटाचे बाभळीचे जंगलात घेऊन जाऊन, त्याच रात्री निर्मनुष्य जागेवर कृष्णा खाटीक यास खंजरने, बुटाचे लाथांनी व मोठया लाकडी खोडाने छातीत गंभीर मारुन, त्यांचा खुन केले. त्यानंतर कृष्णा खाटीक यांचे आंगावर लाकडं व मोटार सायकल मधिल पेट्रोल टाकुन जाळुन त्याचा देह नष्ट केला. असल्याची कबुली दिली आहे. त्यावरुन त्या सर्व 07 आरोपींना पुढील तपास कामी पोलीस ठाणे अर्धापुर गु.र.नं. 61/2018 कीम 363, 364, 302, 201,34 भादंवि या गुन्हयात त्यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदर खुन प्रकरणाचा प्रमुख विकी चव्हाण हा सध्या पोलीस ठाणे नांदेड ग्रामीण येथील गु.र.नं. 115/2018 कलम 307, 34 भादंवि या गुन्हयात नांदेड कारागृहात असुन, त्याचे हस्तक विकी दशरथसिंह ठाकुर व ईश्वरसिंग जशवंतसिंग गिरणीवाले हे सध्या फरार झाले आहेत. त्याचा पोलीस शोध घेत आहेत.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक श्री चंद्रकिशोर मीणा, अपर पोलीस अधीक्षक श्री मंगेश शिंदे व मा. पोलीस निरीक्षक श्री सहाणे यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा नांदेड येथील सपोनि श्री विनोद दिघोरे, पोउपनि श्री कल्याण नेहरकर, श्री सदानंद वाघमारे, पोलीस जमादार दशरथ जांबळीकर, पोलीस शिपाई बालाजी सातपुते, राजु पांगरीकर, जमादार वाघमारे, जमादार जशवंतसिंग शाहु, रमेश खाडे, माधव केंद्रे, संग्राम केंद्रे, धोंडीबा केंद्रे, मनोज परदेशी, मोतीराम पवार, चालक श्रीरामे यांनी विशेष कामगीरी केली आहे. मा. पोलीस अधीक्षक नांदेड यांनी पथकाचे अभिनंदन केले आहे.

सविनय सादर

पो.नि. स्था.गु.शा. नांदेड.

**प्रेस नोट**

**दरोडा घालण्याचे तयारीत असलेले ०६ अटल गुन्हेगार पोलीसांचे जाळयात, एल.सी.बी. ची कारवाई**

काल दिनांक २४.०७.२०१८ रोजी स्थानिक गुन्हे शाखा नांदेड येथील सहा. पोलीस निरीक्षक श्री विनोद दिघोरे व सोबत पोलीस उप निरीक्षक कल्याण नेहरकर, सदानंद वाघमारे व पोलीस जमादार दशरथ जांभळीकर, सुरेश वाघमारे, जशवंतसिंग शाहु, माधव केंद्रे, संग्राम केंद्रे, धोंडीराम केंद्रे, राजु पांगरीकर, बालाजी सातपुते, मनोज परदेशी, मोतीराम पवार, चालक श्रीरामे हे नांदेड जिल्हयातील गुन्हेगाराचा शोध घेण्यासाठी व पोलीस ठाणे अर्धापुर गु.र.क्रं.६१/२०१८ कलम ३६३, ३४ भा.दं.वि. या गुन्हयातील फरार आरोपी शोध घेण्यासाठी नांदेड शहरात पेट्रोलींग करीत असताना दिनांक दिनांक २५.०७.२०१८ रोजी वेळ अंदाजे ०१.३० वा. जुना मोंढा भागातील, भगतसिंग चौक, नांदेड येथे थांबलो असता, गुप्त बातमी दारामार्फत खात्रीशीर माहिती मिळाली की, गोविंद बाग जवळ रोडवरील, गणेश टॉकीज चे समोर एका पांढ–या रंगाच्या स्वीफ्ट डिझायर गाडी क्रमांक एम. एच. २० बी.एल. २२०६ मध्ये व रसत्याच्या कडेला काही इसम हत्यारासह दरोडा टाकण्याच्या इराद्याने अंधारात दबा धरुन बसलेले आहेत. अशी खात्रीशीर बातमी मिळाल्यवरुन, सपोनि विनोद दिघोरे यांनी वरिष्ठांना माहीती देउन, वेळ ०१.४५ वा. सापळा रचुन स्वीफ्ट डिझायर गाडीत बसलेले व रत्याच्या कडेला दबा धरुन बसलेल्या ०६ ईसमांना ताब्यात घेतले. त्या ठिकाणाहुन दोन ईसम पळुन गेले. पकडलेल्या ईसमांची चौकशी केली असता, १. अजयसिंह उर्फ अज्जु पि. गोकुळसिंह ठाकुर रा. सखोजी नगर, नांदेड २. संतोष उर्फ चिंग्या उर्फ शुटर पि. साईनाथ तरटे रा. खोब्रागडेनगर, साठेचौक नांदेड ३.विक्कीसिंह संजयसिंह सिख रा. ढोलेवार गुरुदेव अर्जुनगर, गल्ली क्रमांक.०१ लुधीयाना राज्य पंजाब ह.मु. अण्णा भाउ साठे चौक होल सोसायटी नांदेड ४. दिपक शंकर रायपतवार रा. गुरुद्वारा गेट क्रमांक ०२ चिखलवाडी नांदेड ५. बजरंग अकुंशराव कुंडगीर रा. मुरमुरा गल्ली जुना मोंढा नांदेड ६. आतिष गंगाधर शिंदे रा. शिंदे गल्ली धनेगांव, नांदेड असे असल्याचे व पळून गेलेले कुख्यात गुन्हेगार विक्की दशरथसिंह ठाकुर व ईश्वरसिंघ बसंतसिंघ गिरणीवाले रा. चिखलवाडी, नांदेड असे असल्याचे उघड झाले, त्यांचे ताब्यात एक स्वीफ्ट डिझायर कार क्रमांक एम.एच.२०बी.एल.२२०६, तलवार, सुती दोरखंड, धारधार लोखंडी खंजर, रिंगपाना, अग्निशस्त्र एअर गन पिस्टल असे दरोडा घाल्याचे साहीत्य मिळुन आले आहे. वरिल नमुद ताब्यात घेतलेल्या आरोपींचे नांदेड शहरातील पोलीस स्टेशनचे अभिलेख पहात, त्या सर्वांवर माली गुन्हे व शरीराविरुध्दचे वेगवेगळे गुन्हे दाखल आहेत. सदरचे आरोपी कोणतातरी दरोडया सारखा मोठा दखलपात्र गुन्हा करण्याचे तयारीत असताना मीळुन आले आहेत.

सदर आरोपी विरुध्द पोलीस ठाणे ईतवारा नांदेड येथे त्यांचे विरुध्द कलम 399, 402, भादंवि व सहकलम 4/25, 6/28 भा.ह.का. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर जागेवरुन फरार झालेले गुन्हेगार विकी दशरथसिंह ठाकुर व ईश्वरसिंग जशवंतसिंग गिरणीवाले यांचा पोलीस शोध घेत आहेत.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक श्री चंद्रकिशोर मीणा, अपर पोलीस अधीक्षक श्री मंगेश शिंदे व मा. पोलीस निरीक्षक श्री सहाणे यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा नांदेड येथील सपोनि श्री विनोद दिघोरे, पोउपनि श्री कल्याण नेहरकर, श्री सदानंद वाघमारे, पोलीस जमादार दशरथ जांबळीकर, पोलीस शिपाई बालाजी सातपुते, राजु पांगरीकर, जमादार वाघमारे, जमादार जशवंतसिंग शाहु, रमेश खाडे, माधव केंद्र, संग्राम केंद्रे, धोंडीबा केंद्रे, मनोज परदेशी, मोतीराम पवार, चालक श्रीरामे यांनी विशेष कामगीरी केली आहे. मा. पोलीस अधीक्षक नांदेड यांनी पथकाचे अभिनंदन केले आहे.

सविनय सादर

पो.नि. स्था.गु.शा. नांदेड.

# <u>प्रेसनोट</u>

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड डि.सी.आर. दिनांक २५/०७/२०१८**

## दंगा :-मराठा अंदोलना बाबत दाखल गुन्हयाची माहीती :-

**१)भाग्यनगर :-** दिनांक २४.०७.२०१८ रोजी चे ११.३० वा. चे सुमारास राज कॉर्नर नांदेड येथे, यातील नमुद आरोपीतांनी गैर कायदयाची मंडळी जमवुन सकल मराठा मोर्चातील आरोपीतांनी दंग्यास चेतावणी देवुन जोरजोराने एक मराठा लाख मराठा, आरक्षण आमचे हक्काचे नाही कुणाच्या बापाचे अशा घोषणा देत हातात दगड घेवुन रोडवर बसुन वाहाने आडवीत होते. येणाऱ्या जाणाऱ्या वाहानाचे काचा फोडत होते. सदर प्रकार समजताच मा. श्री चंद्रकिशोर मीणा, पोलीस अधीक्षक नांदेड, मा.श्री. मंगेश शिंदे, अपर पोलीस अधीक्षक नांदेड हे शासकिय वाहानाने आले असता. यातील आरोपीपैकी कुणीतरी इसमाने मा. चंद्रकिशारे मीणा,पोलीस अधीक्षक साहेब नांदेड यांचे शासकीय वाहान सफारी कार सिलर्व रंगाची कार क्रमांक एम. एच. -२६/आर ०७०२ या वाहानावर दगड फेक करुन चालकाचे बाजुची असलेली मागील काच फोडुन अंदाजे १०,०००/-रुपयाचे नुकसान केले. व मा. मंगेश शिंदे, अपर पोलीस अधीक्षक नांदेड यांची सरकारी वहान इरटीका कंपनीची पांढऱ्या रंगाची कमांक एम. एच. -२६/आर-०५०२ सा वाहानाचे बानटवर दगड फेक करुन अंदाजे २०,०००/-रुपयाचे नुकसान केले. असे एकुण ३०,०००/-रुपयाचे नुकसान केले. मा. अपर जिल्हाधिकारी साहेब नांदेड यांचे जमाव बंदी आदेशाचे उल्लंघन केले . वगैरे **फिर्यादी पोना/२१५२ हनमंत मारोती कल्लाळे, पो. स्टे. भाग्यनगर** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पो.स्टे. भाग्यनगर** गुरन २३३/२०१८ कलम १४३, १४७, १४८, १४९, ४२७, १०९, भादवी सह कलम १३५ म. पो. का. व सा. मा. नुकसान कलम ३, ७ क्रि. लॉ. अमेंटमेंट कायद्या प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/ २७९६ के. एन. सांगळे मो.क्र. ०२४६२२६१३६४** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधीक्षक कार्यालय,नांदेड
फोन नंबर ०२४६२-२४४४७४.